# जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम

## त. नरखेड जि. नागपूर

# राज्य स्तरीय चर्चासत्र

## पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग

## तथा

## राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर द्वारा आयोजित

## सत्र २०२२२ – २०२३

## चर्चासत्र अहवाल

**उद्घाटनीय सत्र**

जीवन विकास महाविद्यालय देवग्राम येथे राज्य स्तरीय चर्चासत्राचे आयोजन सामाजिक संशोधनाचे मानवी जीवनातील महत्व या विषयावर करण्यात आलेले होते. या चर्चा सत्रात सर्वप्रथम उद्घाटनीय सत्र घेण्यात आलेले होते. या सत्राचे उद्घाटक तथा मुख्य अतिथी डॉ. दत्तात्रय वाटमोडे, अधिष्ठाता, मानव्य विद्याशाखा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर या चर्चासत्राचे अध्यक्ष, मुख्य आयोजक तथा समन्वयक डॉ. देवेंद्र एस. भोंगाडे, प्राचार्य, जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम, आयोजन सचिव डॉ. राजू जी. श्रीरामे आयोजक सचिव तथा पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख हे होते.




या उद्घाटनीय सत्रात कार्यमाचे प्रास्ताविक करीत असतांना या परिषदेच्या आयोजनामागील मुख्य भूमिका विशद करतांना नवीन शैक्षणिक धोरण – २०२० च्या निमित्याने विविध अभ्यासक्रम हे कौशल्याधीष्टीत स्वरूपात नव्याने तयार होत असतांना पदव्युत्तर वर्गासाठी संशोधन प्रकल्प सादर करावयाचे असल्याने संशोधनाच्या मौलिक प्रकियेत विद्यार्थी केंद्रीभूत मानून प्रस्तुत चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले होते. अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर तथा जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम येथील पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभागाच्या वतीने "सामाजिक संशोधनाचे मानवीय जीवनातील महत्व" या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आलेले होते. यावेळी डॉ. दत्तात्रय वाट्मोडे, अधिष्ठाता मानव्य विद्याशाखा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी उद्घाटक तथा मुख्य उद्घाटनीय विचार प्रस्तुत करीत असतांना आपले मौलिक विचार मांडले. यावेळी ते म्हणाले कि, सामाजिक संशोधन हे एक मौलिक संशोधन असून ते यथार्थ स्वरूपाचे संशोधन आहे. आजच्या मानवीय जीवनावर यांत्रिक युगाचा सर्वाधिक प्रभाव असून त्यातून निर्माण झालेल्या समस्यांचे निदान सामाजिक संशोधनाद्वारे केले जाते. राज्यस्तरीय चर्चासत्राच्या उद्घाटनिय सत्र प्रसंगी गौरवोद्गगार काढतांना अतिशय सुंदर अशा विषयाची निवड राज्यस्तरीय चर्चासत्रासाठी करण्यात आलेली असून आपण कौतुकास पात्र आहात असे मत मांडले. या उद्घाटनीय सत्राचे अध्यक्षीय स्थान डॉ. देवेंद्र भोंगाडे, प्राचार्य, तथा मुख्य आयोजक, जीवन विकास महाविद्यालय, देवग्राम यांनी भूषविले. यावेळी पहिल्या उद्घाटनीय सत्रात डॉ. राजू श्रीरामे उपप्राचार्य तथा आयोजन सचिव, पदवी व पदव्युत्तर अर्थशास्त्र विभाग प्रमुख हे आयोजक सचिव म्हणून उपस्थित होते. या

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राजू श्रीरामे यांनी केले. यावेळी उद्घाटनीय सत्राच्या आपल्या अध्यक्षीय मार्गदर्शनातून डॉ. देवेंद्र भोंगाडे यांनी सामाजिक समस्या आणि संशोधन यांच्या माध्यमातून निर्माण झालेल्या समस्यांवर प्रकाश टाकला. आजच्या आधुनिक समस्यांची निर्मिती हि यांत्रिक युगातून निर्माण झाली असून त्यांचे निदान करण्यासाठी उच्चस्तरीय संशोधन अत्यंत आवश्यक असल्याचे मत यावेळी त्यांनी मांडले. या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. प्रणाली इंगोले यांनी तर डॉ. प्रवीण घारपुरे यांनी आभार मानले.

**पहिले तांत्रिक सत्र**




पहिल्या तांत्रिक सत्रात " सामाजिक संशोधनात सांख्यिकीय उपकरणाचा वापर व चाचण्यांचे परीक्षण" या विषयावर डॉ. समीत माहोरे यांनी आपल्या अभ्यासपूर्ण मार्गदर्शनातून हा विषय अत्यंत सोप्या पद्धतीने मांडला. यावेळी विविध सांख्यिकीय उपकरणाचा कसा वापर कसा करावा हे त्यांनी एस एस पी एस या सांख्यिकीय उपकरणाद्वारे प्रात्यक्षिक दाखवून उपस्थिताना मार्गदर्शन केले. हे अत्यंत उपयुक्त असे पहिले सत्र राहिले या तांत्रिक सत्राचे अध्यक्षीय स्थान डॉ. गजानन पाटील, प्राचार्य, अण्णासाहेब गुंडेवार महाविद्यालय, नागपूर यांनी भूषविले. आपल्या अध्यक्षीय भास्नातून त्यांनी सामाजिक संशोधनातील विसंगत स्थळे व त्यातील तृती कशा पूर्ण करून संशोधन अधिक व्यावहारिक कसे करता येईल यावर प्रकाश टाकला. या पहिल्या सत्राचे सूत्र संचालन डॉ. मदन प्रधान यांनी तर आभार प्रा. खुशाल चोरे यांनी मानले. सदर तांत्रिक सत्र अत्यंत अभ्यासपूर्ण व माहितीपूर्ण होते अशा प्रतिक्रिया सहभागी असलेल्या श्रोत्याद्वारे देण्यात आलेल्या होत्या.

**दुसरे तांत्रिक सत्र**




दुस-या तांत्रिक सत्रात डॉ. मनीष कायरकर यांनी " सामाजिक संशोधनातील संशोधन पद्धती व संशोधन आराखड्याचे महत्व" या विषयावर अभ्यासपूर्ण मार्गदर्शन केले तर या दुसऱ्या तांत्रिक सत्राचे अध्यक्षीय स्थान डॉ. संगीता टक्कामोरे, प्राचार्या तथा अर्थशास्त्र विभाग प्रमुख, नरेंद्र तिडके महाविद्यालय, रामटेक यांनी भूषविले या दुसऱ्या तांत्रिक सत्राचे सूत्र संचालन प्रा. धनराज पांडव यांनी तर आभार प्रा. अंकुश बोबडे यांनी केले. .

**समारोपीय सत्र**




समारोपीय सत्राचे मुख्य अतिथी डॉ. सुनीलकुमार नवीन, प्राचार्य, नबिरा महाविद्यालय, काटोल हे होते तर अध्यक्षीय स्थान डॉ. सुधाकर झामरे, अध्यक्ष अर्थशास्त्र अभ्यास मंडळ, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांनी भूषविले. यावेळी विविध वक्त्यांनी मांडलेल्या मतांवर चर्चा झाली. या समापन श्ल्याच्या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. मंगेश आचार्य यांनी केले तर आभार प्रदर्शन डॉ. योगेश सरोदे यांनी

केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी, डॉ. योगेश सरोदे, डॉ, मंगेश आचार्य, प्रा. अंकुश बोबडे, प्रा. धनराज पांडव यांनी विशेष प्रयत्न केले. या कार्यक्रमाच्या तांत्रिक संचालनाची जबबदारी प्रा, देवेंद्र वासाडे व प्रा. रुपेश शेकार यांनी सांभाळली. सदर चर्चासत्राचे आयोजन आभासी पद्धतीने गुगल मिटवर करण्यात आलेले होते. या चर्चा सत्राला १८८ लोकांनी ऑनलाईन उपस्थिती लावली होती. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक कर्मचारी वर्गानी प्रयत्न केले.